MHSN090013342019

# दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली

(पीठासिन अधिकरी श्री. किरण रा. खोंद्रे)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १६२/२०१९**
**निशाणी क्रमांक ०५ खालील आदेश**

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. वर्धमान बाळासो कोगनोळे. | **वादी.** |
| *विरुध्द* | | |
| ०१. | श्रीमती प्रभावती पायगोंडा पाटील वगैरे ०५ | **प्रतिवादी.** |

**(०१).** प्रस्तुत अर्ज वादी यांनी तुर्तातुर्त मनाईसाठी दिलेला आहे. वादी यांचे कथन आहे की, दावा मिळकत गट क्रमांक ६८१ ही कवठेएकंद, ता. तासगांव, जि. सांगली येथील असून ती मुळची दादू बाळाप्पा कोगनोळे व भुपाल बाळाप्पा कोगनोळे यांनी सन १९७२ साली कुळ कायदा कलम ३२(ग) प्रमाणे रक्कम देऊन प्राप्त केलेली होती. तेव्हापासून दादू व भुपाल हे प्रत्येकी आठ आणे हिश्यामध्ये वहिवाट करित होते. दादू यांना मुलबाळ नसल्यामुळे त्यांना बाळासो यांचा मुलगा रविंद्र म्हणजेच वादीचा भाऊ दत्तक गेला होता व त्या दत्तकपत्राप्रमाणे दादू यांच्या नावाची गटक्रमांक ६८१ मधील आठ आणे हिस्सा हा रविंद्र यांचे नावावरती, दादू यांचे पश्चात लागलेला होता व आहे. त्या आठ आणे हिश्यात रविंद्र दादू कोंगनोळे यांची मालकी हक्कांने स्वतंत्र कब्जे वहिवाट होती व आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०५ या मयत भुपाल बाळासो कोगनोळे यांच्या मुली आहेत, शिवाय प्रतिवादी

क्रमांक ०१ ते ०३ यांचे विवाह सुमारे ४० वर्षापूर्वी झालेले आहेत. वादी हे भुपाल यांचे नातू आहेत, त्या प्रेमापोटी भुपाल यांनी दिनांक १६.०१.१९९५ रोजी प्रस्तुत दावा मिळकत १ब व इतर घर मिळकतींचे रजिस्टर मृत्युपत्र साक्षीदारांच्या समक्ष वादी यांचे नावे लिहून ठेवलेले आहे. सदरचे मृत्युपत्र हे भुपाल कोगनोंळे यांचे अखेरचे व शेवटचे असे होते व आहे. भुपाल कोगनोळे हे दिनांक २२.०९.१९९७ रोजी मयत झाले आहेत. भुपाल यांचे मृत्युनंतर दावा मिळकत १ब मध्ये भुपाल यांची पत्नी श्रीमंती यांची मालकी हक्काने कब्जेवहिवाट होती. श्रीमंती यांचे निधन दिनांक २९.११.२००६ रोजी झाले आहे व त्यानंतर मिळकतीची मालकी वादी यांना मिळालेली होती व आहे.

**(०२).** वादी यांनी पुढे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०५ यांचा दावा मिळकत १ब शी कोणताही, कसलाही हक्क हितसबंध अगर मालकी व कब्जेवहिवाट कधीही नव्हती व नाही. शिवाय प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०४ या पूर्वीपासून आपापल्या पतिंच्या घरी राहत होत्या व आहेत. दावा मिळकतीमध्ये वादी यांची कब्जेवहिवाट चालू असतांना प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी वादी यांचे विरोधात तासगांव येथील दिवाणी न्यायालयाधीश यांचे न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ हा सरस निरस मानाने वाटप होवून मिळण्याबाबत व कब्जा मिळण्याबाबत तसेच दरम्यानचे उत्पन्न मिळण्याबाबत दाखल केलेला होता. सदरच्या दाव्यात प्रस्तुत वादी यांनी त्या दाव्यातील वादी यांना तुर्तातुर्त ताकीद द्यावी म्हणून निशाणी क्रमांक ३५ कडे अर्ज दिलेला होता. सदरचा

अर्ज गुणदोषावर चालून न्यायालयाने मंजूर केला होता व या दाव्यातील प्रतिवादी यांना 'वादीच्या वहिवाटीस हरकत करु नये' म्हणून तुर्तातुर्त ताकीद दिली होती. सदर आदेशावर प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी मे. जिल्हा न्यायाधीशसाो, सांगली यांचे कोर्टात किरकोळ दिवाणी अपील क्रमांक ०१/२०१३ दाखल केले होते, सदरचे अपील गुणदोषावर चालून अपील रद्द केलेले होते. शिवाय वारसा नोंदी बाबत वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान महसूल कोर्टात वाद प्रलंबित आहेत. असे असताना प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी अचानकपणे दाव्यातील तांत्रीक अडचण दुर करुन दुसरा वाटपाचा दावा दाखल करणेचे अटीवर नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ काढून घेण्याचा अर्ज केला होता, सदरचा अर्ज न्यायालयाने दिनांक ३०.११.२०१९ रोजी मंजूर केला होता. त्यानंतर प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी दुसरा वाटपाचा दावा दाखल न करता केवळ प्रतिवादी क्रमांक ०३ यांनी वादी यांचे विरोधात कॅव्हीएट अर्ज क्रमांक ३३/२०१९ दाखल केले होते. दावा मिळकतीच्या रेकॉर्ड सदरी प्रतिवादी यांची नावे आहेत, त्यामुळे प्रतिवादी हे दावा मिळकत १ब तबदील करण्याची भाषा करत आहेत. त्यांना वादी यांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रतिवादी दांडगाव्याची व अरेरावीची भाषा वापरत आहेत. प्रतिवादी हे वादी यांचे अंगावर धावून येवून शिवीगाळ करत आहेत. सबब, दावा मिळकत १ब मध्ये वादी यांच्या शांततामय मालकी हक्क व कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारे हरहरकत करुनये अगर दावा मिळकत १ब ही ७/१२ उताऱ्यावरील तथाकथीत नावावरुन कोणासही कोणत्याही प्रकारे गहाण, दान, विक्री,

बक्षीस अगद तबदील करुनये अशी त्यांना तुर्तातुर्त ताकीद देण्यात अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**(०३).** प्रस्तुत कामी प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०४ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक ४० कडे दाखल करुन तुर्तातुर्त अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०४ यांनी कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी यांच्या घराण्यातील मुळ पुरुष बाळाप्पा कोंगनोळे होते. बाळाप्पा यांना दादू, नाभिराज व भूपाल अशी जनक आपत्ये होती, त्यापैकी भुपाल यांना प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०५ जनक मुली होत्या तसेच राजगोंडा व बाळासाो अशी दोन जनक मुले होती. सन १९५५ साली भुपाल यांनी मुलगा बाळासाो यास त्यांचा सख्खा भाऊ नाभीराजची पत्नी चंपाबाई उर्फ रत्नाबाई हिस दत्तक दिले होते. त्यामुळे दत्तकपत्रानुसार बाळासाो यांचे नाव बाळासाो नाभिराज कोंगनोळे असे झाले होते. सदर बाळासाो यांना वर्धमान व रविंद्र अशी दोन जनक आपत्ये आहेत. बाळासाो यांनी रविंद्र यास फार वर्षापूर्वी आपले चुलते दादू यांना दत्तक दिले आहे. त्यामुळे भुपाल यांचे कुटूंबियाशी बाळासाो तसेच त्यांची मुले वर्धमान व रविंद्र यांचा कोणताही निकट नातेसबंध राहीले नाहीत. त्यामुळे वर्धमान हा मयत भुपाल बाळाप्पा कोंगनोळे यांचा नातू असणेचा प्रश्नच नाही.

**(०४).** प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०४ यांनी पुढे असे कथन केले आहे की, दादु, नाभिराज व भुपाल यांचेमध्ये पटेना झाले म्हणून त्यांनी

वाडवडिलार्जीत मालकी वहिवाटीच्या मिळकती तसेच एकत्र हिंदू कुटूंबाची कुळ हक्काची मिळकत सरस निरस मानाने तोंडी वाटप करुन घेतले होते. त्याप्रमाणे गटक्रमांक ७३५ व ७३६ या मिळकतीची जमीन नाभिराज यांना दिली व सदर जमीन नाभीराज यांचे नावे करुन घेणेसाठी आवश्यक दस्त करुन दिले. दावा कलम १अ मधील एकत्र कुटूंबाची कुळ हक्काची जमीनीपैकी दक्षिणेकडील निम्या हिश्याची मिळकत दादू यांचे वाटपास व उत्तरेकडील निम्या हिश्याची मिळकत भुपाल यांचे वाटपास दिली होती. त्यानंतर दावा कलम १अ च्या मिळकतीमधून आलेल्या उत्पनातून दादू व भुपाल यांनी कुळ कायद्यानुसार निश्चित केलेल्या जमीनीची किमंत आपल्या शाखेतील कुटूंब प्रमुख या नात्यांने रक्कम भरुन मिळकतीच्या उताऱ्या सदरी आपली नावे नोंद करुन घेतली आहेत. अशा प्रकारे दावा मिळकत ही भुपाल यांचे शाखेमध्ये एकत्र हिंदू कुटूंबाची वाडवडिलार्जीत मिळकत म्हणून आलेली मिळकत आहे. सदर मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. मौजे कवठेएकंद येथील सि.स.नं. १७४३, १७५१, १७५५, १७७८, १७५७, १७३६, १७६४, १७४१ या घर मिळकती भुपाल यांचे मालकी–वहिवाटीच्या असून सदर मिळकती भुपाल यांचे शाखेस वाटपाने आलेल्या आहेत. सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा समाईकात मालकी हक्काने आजअखेर कब्जेवहिवाट होती व आहे. दावा मिळकत तसेच घर मिळकती या प्रतिवादीचे वाडवडिलार्जीत मालकीच्या व समाईक कब्जेवहिवाटीत होत्या त्यामुळे त्या मृत्युपत्राने देण्याचा अधिकार मयत भुपाल यांना नव्हते व नाहीत. वादी हा मयत भुपाल याचा नातू असल्यांने आपल्या जनक अपत्यांना

डावलून, वादींचे नावे तथाकथीत मृत्युपत्र करणेचे कोणतेही कारण भुपाल यांना नव्हते व नाही. भुपाल यांचा जनक मुलगा राजगोंडा हा मतिमंद इसम आहे, तो कोणताही कामधंदा करत नाही. अशा विकलांग व्यक्तीचा हिस्सा सक्षम न्यायालयाच्या पूर्व परवानगी शिवाय हस्तांतर करता येत नाही. पाच मुलींच्या पैकी प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ या आपापल्या नवऱ्यांच्या घरी आहेत. उरलेल्यापैकी श्रीदेवी ही भोळसट असल्यांने तिचा विवाह झालेला नाही, तर सुशिला ही सासरच्यांशी न पटल्यांने व घटस्फोट झाल्यांने माहेरीच राहणेस आहे. वादी हक्क सांगू पाहत असलेले मृत्युपत्र हे प्रतिवादींचे असाह्यातेचा गैरफायदा घेवून किमंती मिळकत बेकायदेशिरपणे गिळंकृत करणेचा वादीचा डाव आहे. प्रतिवादी हे वयस्कर असल्याने वाद मिळकत अंगजोरावर बळकावणेसाठी बनावट मृत्युपत्राचा बनाव केला आहे. तथाकथीत मृत्युपत्रावर मयत भुपाल यांनी केव्हाही सही केलेली नाही, तसेच ते रजिस्टर केलेले नाही. प्रस्तुत कामी मनाई झालेस त्यांचा परिणाम राजगोंडा वर होणार आहे, परंतु वादी यांनी त्यास पक्षकार केलेले नाही. त्यामुळे दावेस आवश्यक पक्षकार या तत्वाची बाधा येते.

**(०५).** प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०४ यांनी पुढे असे कथन केले आहे की, मयत भुपाल यांचे मृत्युपश्चात वाद मिळकतीस फेरफार क्रमांक ११००८ ने प्रतिवादी यांची नावे नोंद झालेली आहेत. महसूल कागदपत्रानुसार प्रतिवादी यांचा कब्जा आहे. तथाकथीत मृत्युपत्रात नमुद असलेली मिळकतीचे वर्णन चुकलेले आहे. मयत भुपाल यांना गटक्रमांक

६८१ मध्ये निम्मा हिस्सा आहे, परंतु मृत्युपत्रात पुरा गट असे नमुद आहे. मयत भुपाल व त्यांची पत्नी श्रीमंती यांची सेवासुश्रृषा व पालनपोषन प्रतिवादी क्रमांक ०३ ने केले आहे. त्याचबरोबर प्रतिवादी क्रमांक ०३ ने मतिमंद भाऊ राजगोंडा व घटस्फोटीत बहिण व भोळसट बहिण श्रीदेवी यांचेही पालनपोषन केलेले आहे. वादीने केव्हाही मयत भुपाल व इतरांची सेवासुश्रृषा केलेली नाही त्यामुळे त्यांचे वादीवर प्रेम व जिव्हाळा नव्हता. मयत भुपाल हे मृत्युपूर्वी ४ ते ५ वर्षे अंथरुणाला खिळून होते. त्यामुळे प्रतिवादी हे डॉक्टरांना घरी बोलाऊनच उपचार घेत होते. न्यायालयाने पूर्वीच्या दाव्यात दिलेली मनाई ही दरम्यानच्या स्वरुपाची होती, ती मनाई निरंतर नसल्यामुळे त्याच आधारावर या कामी मनाई मागता येणार नाही. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत वेगवेगळी पिके घेवून आजअखेर कब्जेवहिवाट करत होते व आहेत. उपरोक्त सर्व तथ्यामुळे वादीचा दरम्यान अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०४ यांनी केलेली आहे.

**(०६).** वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. संपुर्ण कागदपत्राची पडताळणी व अवंलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज निर्णित करणे हेतु माझे समोर खालील वादप्रश्न उपस्थितीत होतात. त्यावरील कारणमिमांसा व निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **०१** | वादी सकृतदर्शनी खटला असल्यांचे शाबीत करतात काय ? | **नाही.** |

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०२ | न्यायाचा तौलनीक कल वादीच्या बाजूने आहे काय ? | **नाही.** |
| ०३ | प्रस्तुत अर्ज नाकारल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय ? | **नाही.** |
| ०४ | आदेश काय ? | **अर्ज नामंजुर करणेत आला.** |

**(०७).** वादी यांनी त्यांचे म्हणण्याच्या समर्थनार्थ खालील न्यायनिवाड्यांचा आधार घेतला आहे.

| अ.क्र. | न्यायनिर्णय. |
|---|---|
| ०१. | सेंट्रल बँक ऑफ इंडीया वि. सायन बेकर्स.<br>**२००८ (५) एम.एच.एल.जे. ७७२.** |
| ०२. | रिटा प्रेमचंद वि. महाराष्ट्र सरकार.<br>**२००१ (४) एम.एच.एल.जे. ६७१.** |
| ०३. | दादा भगवान शिंदे वि. तुलसाबाई नारायण शिंदे.<br>**२००८ (३) एम.एच.एल.जे. ४७५.** |
| ०४. | साजिद इस्माईल वि. सायराबी अब्दुल गफर शेख.<br>**२०१४ (१) एम.एच.एल.जे. १८२.** |
| ०५. | अब्दुल अजीज खान वि. एम.एम.आर.डी.ए.<br>**२०१५ (२) ऑल. एम. आर. ९९.** |
| ०६. | बबन शामराव मेंघरे वि. मधुकर शामराव मेंघरे.<br>**२००७ (१) ऑल. एम. आर. ७४६.** |

**(०८).** प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०४ यांनी त्यांचे बचावाच्या समर्थनार्थ खालील न्यायनिवाड्यांचा आधार घेतला आहे.

| अ.क्र. | न्यायनिर्णय. |
|---|---|
| ०१. | मे. अश्वीनी पान प्रॉडक्ट प्रा. लि. विरुध्द मे. कृष्णा ट्रेडर्स.<br>**दिल्ली उच्च न्यायालय. सी.एस.(ओ.एस.) नंबर २८४/२०१२.** |
| ०२. | आंध्रा सरकार वि. मे. स्टार बोन मिल.<br>**२०१३ डीजी.लॉ. (सुप्रीम कोर्ट) २१८८.** |
| ०३. | जयम्मा वि. मरीया बाई.<br>**२००४ डीजी.लॉ. (सुप्रीम कोर्ट) ५९४.** |
| ०४. | धोंडी विठोबा कोळी वि. महादेव कोळी.<br>**१९७२ डीजी.लॉ. (मुंबई) १७.** |
| ०५. | प्रकाश सुखदेव अकोटकर वि. मंसुरखाँ गुलाबखाँ.<br>**१९९५ डीजी.लॉ. (मुंबई) ३४४.** |
| ०६. | सरोजिनी चंद्रकांत तिऱ्हेकर वि. यमुनाबाई सोपान झोळ.<br>**२००७ डीजी.लॉ. (मुंबई) १२७१.** |
| ०७. | सवित्रा बपु शिंदे वि. राऊ रामा शिंदे<br>**२००५ डीजी.लॉ. (मुंबई) ११२७.** |

## कारणमिमांसा.

## वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ करिता.

(०९). सदरील वादप्रश्न हे परस्परात गुंतले असल्यांने तथ्यांची पुनरावृत्ती टाळणेहेतु एकत्रीत विचारात घेतले आहेत. नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ व त्यामध्ये प्रस्तुत प्रतिवांदीचे विरूध्द दरम्यानचे मनाईचा आदेश होता ही बाब वादातीत नाही. म्हणजेच सदर दाव्यामध्ये प्रस्तुत वादींचा दावा मिळकतीत 'त्यावेळी' कब्जा होता असे मानावेच लागेल. परंतु त्या आदेशावरून दावा मिळकतीत आज ही म्हणजेच या दाव्याच्या दाखल तारखे दिवशी, प्रस्तुत वादींचा कब्जा आहे असे अनुमान काढणे

कितपत योग्य ठरेल, का वादीस या कामी, मिळकत त्यांचे कब्जात होती हे सकृतदर्शनी आणि नव्याने शाबीत करणे आवश्यक आहे किंवा कसे हे बघणे गरजेचे आहे. माझ्या म्हणण्यानुसार आणि मतानुसार वादीस हे तथ्य नव्याने परंतु सकृतदर्शनी शाबीत करावेच लागेल. याचे कारण असे आहे की, कबुल तथ्यानुसार नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ चा 'अंतिम' असा निकाल, आणि तो ही गुणदोषावर झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे व ते नाकारता अगर दुर्लक्षता येणार नाही. जर नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ हा गुणदोषावर चालुन निकाली झाला असता तर बाब वेगळी होती. प्रतिवादींनी याच मुद्यावर नामदार अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या *१९९३ डी.जी.लॉ. १९२, मे. कनोरिया केमिकल्स वि. उत्तर प्रदेश वीज कं.* या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे की ज्यातील परिच्छेद क्रमांक ०६ मध्ये ***'दाव्याच्या दरम्यान पारीत झालेले अंतरिम आदेश, जर शेवटी दावा फेटाळणेत आला असेल तर, ते अंतरिम आदेश जणु पारीत झालेच नव्हते असेच मानावे लागेल.'*** असे निर्देशित केले आहे. या न्यायनिर्णयाचा उचित मान राखुन माझे असे मत आहे की, तो या कामी तथ्यांच्या समानतेमुळे तंतोतंत लागु पडतो. सबब, या वादीस हा दावा दाखल तारखेवेळी, दावा मिळकत त्याचे कब्जेवहिवाटीस आहे, हे सकृतदर्शनी आणि ते ही नव्याने शाबीत करावेच लागेल.

**(१०).** या करिता वादीने काय पुरावा दिला आहे ते बघणे आवश्यक व गरजेचे आहे. वादीचे कथनानुसार दावा मिळकत ही मुळची दादु बाळाप्पा

कोगनोळे व भुपाल बाळाप्पा कोगनोळे यांनी सन १९७२ साली कुळ कायदा कलम ३२(ग) प्रमाणे रक्कम देऊन प्राप्त केलेली होती. तेव्हापासुन दादू व भुपाल हे प्रत्येकी आठ आणे हिश्यामध्ये वहिवाट करित होते. दादू यांना मुलबाळ नसल्यामुळे त्यांना बाळासाो यांचा मुलगा रविंद्र म्हणजेच वादीचा भाऊ दत्तक गेला होता व त्या दत्तकपत्राप्रमाणे दादू यांच्या नावाची गटक्रमांक ६८१ मधील आठ आणे हिस्सा हा रविंद्र यांचे नावावरती, दादू यांचे पश्चात लागलेला होता व आहे. त्या आठ आणे हिश्यात रविंद्र दादू कोंगनोळे यांची मालकी हक्कांने स्वतंत्र कब्जे वहिवाट होती व आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०५ या मयत भुपाल बाळासाो कोगनोळे यांच्या मुली आहेत, शिवाय प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांचे विवाह सुमारे ४० वर्षापूर्वी झालेले आहेत. स्वतः वादी हे भुपाल यांचे नातू आहेत.

**(११).** वादी येणेप्रमाणे कथन करीत असले तरी मुलतः त्यांचे जनक वडील म्हणजे बाळासो की जे भुपाल यांचे पुत्र होते, ते नाभिराज यांना दत्तक गेले असलेबाबत वादी काहिही कथने करीत नाहीत. जर वादीचे जनक वडीलच नाभिराज यांना दत्तक गेले असतील तर वादी हे भुपाल यांचे 'चुलत नातु' होतात, ना की 'सख्खे नातु'. कबुल तथ्यानुसार भुपाल यांना चार मुली व एक मुलगा (दत्तक गेलेले वादीचे वडील सोडुन) अशी पाच अपत्ये असताना, भुपाल यांनी आपल्या चुलत नातवाच्या नावाने त्यांची सर्व मिळकत मृत्यपत्राने का तबदील केली? याचा समाधानकारक खुलासा समोर येत नाही. प्रतिवादी म्हणतात त्याप्रमाणे, भुपाल यांचा मुलगा राजगोंडा की जो

या दाव्यास पक्षकार म्हणुन सामील नाही, तो मानसिकदृष्ट्या सक्षम नाही, हे तथा सर्व मुलींची लग्ने झाली आहेत हेच कारण असु शकते. कबुल तथ्यानुसार वादातील मृत्युपत्रामध्ये गट क्रमांक ६८१ हा पुरा गट समाविष्ट आहे. भुपाल हे गट क्रमांक ६८१ चे पुर्ण मालक नव्हते व त्यात दादुचा १/२ हिस्सा होता व आहे ही बाब वादीस देखील मान्य व कबुल आहे. सदरील मृत्युपत्र जरी या दाव्याचा विषय नसले तरी वादीस दावा मिळकती अनुषंगाने प्राप्त झालेल्या 'सर्व तथाकथित अधिकारांचा स्त्रोत' हे वादातील मृत्युपत्रच असल्यामुळे त्याबाबत विवेचन करणे आवश्यक झालेले आहे.

**(१२).** वादीचा दावा हा **पुर्णपणे** नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ या दाव्यातील निशाणी क्रमांक ३५ वरील आदेशावर आधारीत आहे ही बाब विचारात घेताना, प्रस्तुत प्रतिवादींनी त्याकामी दाखल केलेली कैफियत व पर्यायाने या वादीचा, 'दावा मिळकतीत' असलेला कब्जा कबुल करणे हे प्रामाणिक होते का? असा प्रश्न मला पडतो आहे. याचे कारण असे आहे की, प्रतिवादींनी याकामी दाखल केलेले 'राजगोंडा भुपाल पाटील आणि श्रीदेवी भुपाल पाटील' यांचे करिता पालक/गार्डियन म्हणुन नेमले असले बाबत, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेले दाखले पाहिले असता, सदरील दोन्ही इसम म्हणजेच या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ०५ व पक्षकार म्हणुन सामील नसलेले, 'राजगोंडा भुपाल पाटील' हे दोघेही मानसिकदृष्ट्या असक्षम म्हणजेच मतिमंद असलेचे स्पष्टपणे दिसुन येते. जर असे असेल तर नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ या कामी, त्यांनी थेट/प्रत्यक्ष

अशी कैफियत ते ही वकीलांचे मार्फत कशी दाखल केली? तसे कायद्याने करता येते का? असे बरेच प्रश्न उपस्थित होतात. कबुल तथ्यानुसार नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ या कामी, प्रस्तुत वादी व या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ०५ व पक्षकार म्हणुन सामील नसलेले 'राजगोंडा भुपाल पाटील' यांनी एकत्रीत कैफियत निशाणी क्रमांक १३ येथे दाखल केली आहे. म्हणजेच नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ मध्ये सदरील मतिमंद इसमांचे वतीने कैफियत दाखल करतेवेळी काहीतरी काळेबेरे झाले असावे असे माझे स्पष्ट मत आहे व ते प्रस्तुत वादीनेच केले असणे स्वाभाविक आहे. कारण निशाणी क्रमांक १३ वरील कैफियत दाखल करणाऱ्या ०३ व्यक्तींपैकी केवळ वादीच म्हणजेच त्या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ०४ हेच एकटे मानसिकदृष्ट्या सक्षम असे होते.

**(१३).** तसेच कबुल तथ्यानुसार वाद मिळकतीचे महसुल दफ्तरी प्रस्तुत प्रतिवादींची नावे देखील दाखल आहेत ही बाब नाकारता येत नाही. वादींचा सर्व भार हा यापैकी काही प्रतिवादींनी नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२००९ मध्ये दाखल केलेली कैफियत, विविध अन्य प्रकरणांमध्ये या वादीच्या कब्जाबाबत केलेल्या विधानांवर आहे असे दिसुन येते. काही असले तरी, प्रतिवादी यांची नावे महसुल दफ्तरी सामाईकात दाखल आहेत इतकेच नव्हे तर घर मिळकतींना देखील केवळ प्रतिवादींचीच नावे नमुद आहेत ही बाब विचारात घेणे अत्यावश्यक आहे.

**(१४).** वादीचे पुढे कथन असे आहे की, भुपाल कोगनोळे यांचे मृत्युनंतर दावा मिळकत १ब मध्ये भुपाल यांची पत्नी श्रीमंती (म्हणजेच प्रस्तुत प्रतिवादींची जनक आई) यांची मालकी हक्काने कब्जेवहिवाट होती. श्रीमंती यांचे निधन दिनांक २९.११.२००६ रोजी झाले आहे व त्यानंतर मिळकतीची मालकी वादी यांना मिळालेली आहे. जर वाद मिळकत मृत्युपत्राने वादीस आली आहे, तर भुपाल यांचे मृत्युनंतर लगेचच त्याचा अंमल होऊन मिळकत वादींना का मिळाली नाही? व त्यास श्रीमंती यांचे नाव का दाखल झाले, ती मिळकत श्रीमंती यांचे ताब्यात का आली? यांचे स्पष्टीकरण सदरील मृत्युपत्र वाचल्याशिवाय होणारे नाही. सबब, मी ते वाचत आहे. मृत्युपत्राचे बारकाईने वाचन केले असता असे दिसुन येते की, त्यामध्ये मृत्युपत्राचा अंमल होणेकरिता विविध अटी व शर्ती नमुद केल्या आहेत. जसे की, *भुपाल यांचे मृत्युनंतर मिळकत त्यांची पत्नी श्रीमंती हीने तिचे हयातीत कसणेची होती. वादी यांनी श्रीमंती यांचा सांभाळ भुपाल यांचे पश्चात करणेचा होता. तसेच राजगोंडा व सुशिला यांचा सांभाळ देखील भुपाल यांचे पश्चात वादीनेच करणेचा होता*. ही बाब विशेषत्वाने इथे नमुद करणे आवश्यक आहे की, वादी हे मृत्युपत्राद्वारे त्यांना प्राप्त झालेल्या केवळ अधिकारांचीच बात करतात परंतु त्याद्वारे त्यांचेवर विश्वासाने देण्यात आलेल्या जवाबदाऱ्यांबाबत सोयिस्कररित्या मौन धारण करतात. सर्वात महत्वाचे म्हणजे या मृत्युपत्रात नमुद असलेल्या मिळकती या वडीलोपार्जित आहेत अगर स्वसंपादित याचा स्पष्ट असा उल्लेख नाही. मयत भुपाल यांनी मुलींना काहीही दिले नाही कारण त्यांची लग्ने सुस्थळी करून दिलेली आहेत असे त्यात नमुद आहे. त्याहीपुढे

दावा मिळकतीत मयत भुपाल यांचा १/२ हिस्सा असताना मृत्युपत्र बाकी पुर्ण हिस्स्याचे करणेत आले आहे. कबुल तथ्यानुसार मयत भुपाल हे सेवानिवृत्त शिक्षक होते व त्यांचेकडुन अशी चुक होईल, हे अशक्य जरी नसले तरी मला अतर्क्य नक्कीच भासते.

**(१५).** काही असले तरी दावा मिळकतीत दावा दाखल तारखेस वादीचा कब्जा होता किंवा कसे हेच याठिकाणी महत्वाचे आहे. याकरिता उभय पक्षकारांनी दाखल केलेली कागदपत्रे पाहिली असता असे दिसुन येते की, मौजे कवठेएकंद येथील खाते क्रमांक १०१८२३ चे उताऱ्यास *आक्काताई नरसगोंडा पाटील, प्रभावती पायगोंडा पाटील, राजगोंडा भुपाल कोगनोळे, श्रीदेवी भुपाल कोगनोळे, सुशीला राजगोंडा पाटील व सुशीला शामराव चुडाप्पा* यांची नावे दाखल आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे वादीचे नाव सदर उताऱ्यास दाखल नाही. तसाच प्रकार गट क्रमांक ६८१ चे ७/१२ उताऱ्यावर आहे. विशेष म्हणजे वादीचे नाव ७/१२ उताऱ्यावर कब्जेदार सदरी देखील नमुद नाही. कबुल तथ्यानुसार महसुल दफ्तरीचे उतारे हे मालकीचा पुरावा होऊ शकत नसले, तरी मिळकतीच्या कब्जा बाबत नक्कीच प्रकाश टाकणारे असतात. निशाणी क्रमांक ०९ वरील ७/१२ उतारा पाहिला असता त्यावर इतर हक्कामध्ये 'सक्षम प्राधिकरणाच्या पुर्व परवानगी शिवाय हस्तांतरणास बंदी, कुळ कायद्याने प्राप्त जमीन, नियंत्रीत सत्ता प्रकार' असा स्पष्ट उल्लेख आहे की जो वादातील मृत्युपत्राच्या मुळाशी जाणारा आहे. याचे कारण असे आहे की, कुळ कायद्याने मिळालेल्या जमिनीचे मृत्युपत्र देखील

करता येत नाही अशी स्पष्ट तरतुद व पर्यायाने तशी अट कलम ३२(एम) च्या दाखल्यावर असते. अशी कोणतीही पुर्वपरवानगी मृत्युपत्रावेळी घेतली असल्याचे दिसुन येत नाही.

**(१६).** कबुल तथ्यानुसार वादीचा दावा व पर्यायाने हा अर्ज हे पुर्वीच्या न्यायिक प्रकरणातील आदेश व मिळकतीतील ऊस पीक कारखान्यास घातले असले बाबतच्या काही पावत्या तसेच पाणीपुरवठा संस्थेच्या पावत्या यावर आधारीत आहे. याउलट प्रतिवादींची नावे महसुल दफ्तरी समाईकात दाखल आहेत व प्रतिवादींनी ग्रामपंचायतीकडे कर भरणा केल्याबाबतच्या पावत्याही हजर केल्या आहेत. या कागदपत्रांचा तौलनिक विचार करता ऊसाची बिले व आज अस्तित्वात नसलेला मनाईचा आदेश, याच्या तुलनेत महसुल दफ्तरी दाखल असलेली नावे, ग्रामपंचायतीस अदा केलेल्या महसुलाच्या पावत्या याच कागदांवर विसंबावे लागत आहे. एकंदरीत कागदपत्रावरून वादीचा दावा मिळकतीत प्रत्यक्ष असा कब्जा आहे हे सकृतदर्शनी दिसुन येत नाही म्हणजेच सकृतदर्शनी खटला वादीचे बाजुने नाही असेच अनुमान निघते. सबब, मनाई न दिलेस वादीचे पैशाचे स्वरूपात भरून येणार नाही असे नुकसान होत नाही तसेच न्यायाचा तौलनिक कल ही वादीचे बाजुने नाही असेच अनुमान मला काढणे भाग आहे. सबब, मी **वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ नकारार्थी** उत्तरी करीत आहे.

**(१७).** आता वादींनी आधार घेतलेल्या व वर नमुद परिच्छेद क्रमांक ०४ मध्ये उल्लेखीत असलेल्या मा. वरीष्ठ न्यायालयांच्या न्यायनिर्णयांचे

विवेचन करणे आवश्यक आहे. अ.क्र.०१ वरील न्यायनिर्णयामध्ये ना. मुंबई उच्च न्यायालयाने परिच्छेद क्रमांक ३७ मध्ये '***एखाद्या पक्षकाराने दिलेली कबुली हाच त्याचेविरूध्द सर्वोत्तम पुरावा ठरते***' असे निर्देशित केले आहे. या निर्णयाचा उचित मान राखून माझे असे मत आहे की, तो या कामी लागु पडत नाही. याचे कारण असे आहे की, या कामी प्रतिवादींनी वादीचे हिताची अशी कोणतीही कबुली दिलेली नाही हे वास्तव आहे. वादीचा दावा हा प्रतिवादींचे पुर्वीच्या दाव्यातील कबुलीवर आधारीत आहे. प्रतिवादींनी याच मुद्यावर नामदार अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या *१९९३ डी.जी.लॉ. १९२, मे. कनोरिया केमिकल्स वि. उत्तर प्रदेश वीज कं.* या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे की ज्यातील परिच्छेद क्रमांक ०६ मध्ये ***'दाव्याच्या दरम्यान पारीत झालेले अंतरिम आदेश, जर शेवटी दावा फेटाळणेत आला असेल तर, ते अंतरिम आदेश जणु पारीत झालेच नव्हते असेच मानावे लागेल.***' या निर्णयावरून सदरची कबुली या दाव्याचे कामी आणि ते ही मिळकतीच्या सध्याच्या कब्जाबाबत वाचता येणार नाही असे माझे मत आहे.

(१८). वादींनी वर परिच्छेद क्रमांक ०४ मध्ये दाखल केलेले अ.क्र. ०२ ते ०५ वरील न्यायनिवाडे हे महसुल दफ्तरीच्या नोंदींवरून मालकी हक्काबाबत निघु शकणाऱ्या निश्कर्षाबद्दल आहेत. कबुल तथ्यानुसार महसुल दफ्तरीचे उतारे हे मालकीचा पुरावा होऊ शकत नसले, तरी मिळकतीच्या कब्जा बाबत नक्कीच प्रकाश टाकणारे असतात. प्रतिवादींनी याच मुद्द्यावर परिच्छेद क्रमांक ०५ मध्ये अ.क्र.०२ येथे नामदार सर्वोच्च न्यायालयाचा

निवाडा दाखल केला आहे की ज्याचे परिच्छेद क्रमांक १० मध्ये '***महसुल दफ्तरीच्या नोंदींवरून मिळकतीच्या कब्जाबाबत निश्चितपणे निश्कर्ष काढता येतील***' असे नमुद केले आहे. कबुल तथ्यानुसार या कामी महसुल उताऱ्यांवर मालक व कब्जेदार सदरी केवळ प्रतिवादींचीच नावे नमुद आहेत.

**(१९).** वादींनी अ.क्र. ०६ येथे दाखल केलेल्या न्यायनिवाड्यामध्ये, सकृतदर्शनी खटला, न्यायाचा तौलनिक कल व अपिरीमित हानी या तत्वांचा उहापोह केलेला आहे. या निर्णयाचा उचित मान राखून माझे असे मत आहे की, तो अंतरिम मनाईच्या सर्वच प्रकरणांमध्ये लागु पडतो व त्यांचा योग्य असा विचार करूनच मी ही तीनही तत्वे वादीचे बाजुने नाहीत असे अनुमान काढले आहे.

**(२०).** आता प्रतिवादींनी आधार घेतलेल्या व वर नमुद परिच्छेद क्रमांक ०५ मध्ये उल्लेखीत असलेल्या मा. वरीष्ठ न्यायालयांच्या न्यायनिर्णयांचे विवेचन करणे आवश्यक आहे. अ.क्र.०३ वरील न्यायनिर्णयामध्ये ना. सर्वोच्च न्यायालयाने परिच्छेद क्रमांक ११ मध्ये '*कुळ कायदा कलम ३१ नुसार ज्या मिळकतीचा ताबा कुळाकडे आलेला आहे अशी मिळकत कोणत्याही प्रकारे तबदील करणे बेकायदेशीर ठरते*' असे निर्देशित केले आहे. तसेच पुढे '*अशा मिळकतीची तबदीली केवळ अशा व्यक्तींकडेच करता येईल की ज्यांना वारस म्हणुन त्या मिळकतीचे वाटप मागणेचा अधिकार आहे.*' कबुल तथ्यानुसार या कामी कुळ कायद्याखाली

मिळालेली मिळकत मृत्युपत्राने चुलत नातवास की ज्यास सदर मिळकतीत प्राप्त परिस्थितीत वाटप मागणेचा अधिकार नव्हता, त्यास तबदील करणेत आली आहे.

**(२१).** अ.क्र.०४ मधील निर्णयात ना. मुंबई उच्च न्यायालयाने परिच्छेद क्रमांक १० मध्ये '*जर एकत्र कुटूंब असताना कुळ खरेदीची रक्कम भरणेत आली असेल आणी तद्नंतर कुटूंब पुढेही एकत्र राहीले असेल तर कुळ खरेदीची रक्कम एकत्र कुटूंबाकरिता भरली होती व त्याचा फायदा पुर्ण कुटूंबाला झाला पाहिजे*' असे निर्देशित केले आहे. सदरील न्यायनिर्णय समान तथ्ये असल्यामुळे याकामी लागु पडतो.

**(२२).** अ.क्र.०५ मधील निर्णयात ना. मुंबई उच्च न्यायालयाने परिच्छेद क्रमांक ०४ मध्ये '*मागितलेल्या मनाईचे स्वरूप महत्वाचे असते. जर वादी सरसकट सर्व सहहिस्सेदांचे विरूध्द मनाई मागत असेल तर तशी मनाई देता येणार नाही' असे निर्देशित केले आहे*'. कबुल तथ्यानुसार यातील वादी हा त्यास ज्याने तथाकथित मृत्युपत्र करून दिले आहे त्या इसमाच्या सर्व मुलांच्या विरूध्द आणि ती देखील सरसकट मनाई मागत आहे.

**(२३).** अ.क्र.०६ मधील निर्णयात ना. मुंबई उच्च न्यायालयाने परिच्छेद क्रमांक ११ मध्ये '*वादाकरिता जरी मृत्युपत्र खरे आहे असे मानले तरी ते मृत्युपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या हिस्स्यापुरतेच खरे व परिणामकारक*

*आहे असे मानावे लागेल'* असे निर्देशित केले आहे. सदरील न्यायनिर्णय देखील समान तथ्यांमुळे याकामी तंतोतंत लागु पडतो.

**(२४).** सर्व तथ्यांचा आणि न्यायनिर्णयातील कायदा पाहता तसेच वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ वरील निश्कर्ष यांचा एकत्रीत विचार करता, वादप्रश्न क्रमांक ०४ चे अनुषंगाने मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** अर्ज नामंजुर करणेत आला.

Kiran Rajaram Khondre

Digitally signed by Kiran Rajaram Khondre
Date: 2020.02.17 17:47:35 +0530

**तासगांव.** (किरण रा. खोंद्रे)
दिनांक : १७ फेब्रुवारी २०२०. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. रुपेश शिवाजी पोळ.

न्यायालय – दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव,
जिल्हा सांगली.

दिनांक – १७ फेब्रुवारी २०२०.

न्यायीक अधिकारी यांनी
सही केलेली दिनांक – १७ फेब्रुवारी २०२०.

आदेश अपलोड दिनांक – १७ फेब्रुवारी २०२०.